नियमीत दिवाणी दावा क्र.११/२०२१
भागिरथीबाई वि. शासन

**<u>नि.क्र.९९ खालील आदेश</u>**

**०१.** सदरकामी वादीतर्फे ऑनलाईन स्वरुपात त्यांच्या विधीज्ञांनी अर्ज दिला की, वकिलांकडे वादी तिच्या जावयासह आणि भावासह ऑफीसावर गेली असता तिने वकील बदलायचे आहेत असे सांगितले आणि वकिलांची फी दिली नाही. तसेच, पुढील साक्षीदारासाठी कोणतीही सूचना किंवा माहिती दिली नाही. त्यामुळे, साक्षीदाराचे शपथपत्र देता येत नाही. त्यामुळे, प्रकरणी पुढील तारीख मिळावी.

**०२.** वादी न्यायालयासमोर हजर आहेत. त्यांच्यासोबत त्यांचे पती बालाजी हे हजर आहेत. दि.०२/०८/२०२२ रोजी याकामी मुद्दे निघाले. तेव्हापासून प्रकरण वादीच्या पुराव्यावरती साडे तीन वर्षे आहे. वादीने आपला पुरावा दि.१९/१०/२०२४ रोजी पहिला साक्षीदार गुरुसिमरन सिंग यांच्यामार्फत दिला. प्रत्यक्षात वादीने स्वत:ची साक्ष अजूनपर्यंत दिलेली नाही. वकिलांच्या अर्जावरुन असे दिसते की, वादी त्यांच्याकडे जात नाही. त्यामुळे, त्यांना वादीचे शपथपत्र तयार करता येत नाही.

**०३.** वादीचे वर्तन पाहता दावा रद्द करणे असा प्रर्याय दिसतो. वादीने स्वत:चा जबाब अद्यापपर्यंत का दिला नाही याचे कोणतेही संयुक्तीक कारण दाव्यात दिसत नाही. वादीच्या प्रकरणाची फाईल सध्याचे वकील श्री. विहिरे यांच्याकडे असणार आहे, ती ताब्यात मिळेपर्यंत नवीन वकील शपथपत्र तयार करु शकणार नाहीत आणि सदरचे प्रकरण आणखी काही वर्षे लांबण्याची शक्यता आहे. त्यामुळे, नेमलेल्या तारखेस वादीने स्वत:च्या शपथपत्रासहीत अन्य साक्षीदारांची शपथपत्रे जर सादर केली नाहीत, तर वेगळा आदेश न करता, याच आदेशाने दावा रद्द करण्याचे समजण्यात यावे. वादीस आदेश कळावा म्हणून तो जाणिवपुर्वक मराठी भाषेत केलेला आहे.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**
दिनांक:१६/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर